(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# पर्यटनाचे अर्थशास्त्र

**डॉ.रमजान फत्तुखान मुजावर** सहायक प्राध्यापकव विभागप्रमुख अर्थशास्त्र विभाग, लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस्,कॉमर्स अंड कॉमर्स,सातारा. भ्रमणध्वनी -९९२१८०३६३३

---

**प्रस्तावना :**

पर्यटन हा सद्य परिस्थितीतील सर्वात महत्वाचा आर्थिक व्यवसाय आहे. हा व्यवसाय झपाट्याने विकसित होत आहे. पर्यटन हा घटक सर्व सामाजिक व वैज्ञानिक शास्त्रांशी निगडीत आहे. पर्यटनाचा अर्थशास्त्र, समाजशास्त्र, विज्ञान, व्यवस्थापन या घटकांशी जवळचा संबंध आहे. पर्यटनात आर्थिक व्यवहार होत असल्याने वस्तू उत्पादन, वितरण, देवाण-घेवाण, बाजारपेठा या सर्वाचा समावेश पर्यटनात होतो.पर्यटन हा जागतिक स्तरावरील महत्वाचा आर्थिक व्यवसाय बनला आहे. अनेक देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात पर्यटन व्यवसायाचा सिंहाचा वाटा आहे.अलिकडच्या काळात पर्यटनाचा कल बदलला आहे. पर्यटन म्हणजे मनोरंजनासाठी बाहेर पडणे हाच हेतू असतो. पूर्वीच्या काळी धार्मिक, ज्ञानार्जन व नातेवाईकांच्या भेटी घेणे असा होता. पर्यटनात सध्या गतिमानता आलीआहे.पर्यटनाला एक उद्योग म्हणून स्वरूप प्राप्त झाले आहे. आधुनिक वाहतूक व्यवस्था व निवासाच्या आरामदायी सोयी सुविधा यामुळे पर्यटन हा नवनवीन संकल्पनांच्या शोधात आहे.

वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे किल्ले, राजधान्या, युद्धभूमी यांचे प्रत्येकालाच आकर्षण असते. काही प्राचीन नगरे आपले गतवैभव प्रतिबिंबीत करत असतात तर काही वस्त्या आधुनिक वास्तूरचनेची साक्ष देतात. या साऱ्या वैभवशाली ठिकानांना भेटी देणे पर्यटकांना आवडते. भारताचीवैभवशाली सांस्कृतिक परंपरा जगात स्वतःचा वेगळा ठसा उमटवते. भारतात अनेक समाजाचे लोक एकदिलाने राहतात. या प्रत्येक समाजाच्या वेगवेगळया रुढी परंपरा अस्तित्वात आहेत. त्या रुढीपरंपरेनुसार अनेक सण उत्सव आनंदात साजरे केले जातात. या उत्सवात सहभागी होण्यासाठी, त्याचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक उत्सुक असतात.आदिमानवापासून ते आजपर्यंत मानव प्रवास करत आहे.कालांतराने त्यामध्ये बदल होऊन नवीन प्रदेश शोधणे असा झाला. आज प्रवास हा मनोरंजन करणे व आनंद मिळविणे यासाठी केला जातो. सध्या पर्यटन हा आर्थिक धन मिळविण्याचे साधन बनला आहे. पर्यटनाचे स्वरूप कालपरत्वेपर्यटनाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटनाने सामाजिक, आर्थिक व राजकीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. पर्यटनाचे महत्त्व सामान्य नागरिकांपासून ते श्रीमंतापर्यंत सर्वांना समजले आहे.यामुळे मानवाची आर्थिक व मानसिक क्षमता सुधारण्यास मदत होते. पर्यटन हा घटक फक्त एका बाबीत संकुचित न राहता सर्व विषयांना गवसणी घालत आहे. सद्य स्थितीत पर्यटन हा उद्योग मोठ्या प्रमाणात विकसीत होत आहे. मनोरंजनाबरोबर आर्थिक लाभ हा हेतू पर्यटनातून साध्य होत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

सदर संशोधन पेपरची उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) पर्यटन म्हणजे काय किंवा पर्यटनाचा अर्थ समजून घेणे.
२) भारतातील पर्यटनाचे महत्व जाणून घेणे.
३) पर्यटनाचा आर्थिक घटकावर होणारापरिणामस्पष्ट करणे.
४) पर्यटन आणि शाश्वत विकास यांचा संबंध स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुतसंशोधन भारतातील पर्यटन विकासाच्या अर्थशास्त्राशी संबंधित आहे. हा अभ्यास पूर्णपणे दुय्यम माहितीवर आधारित आहे. संशोधनासाठी आवश्यक असणारी दुय्यम माहितीसाठी पुस्तके, संशोधन मासिके, इंटरनेट इ.वापर करण्यात आला आहे.

**पर्यटनाचा अर्थः**

पर्यटन म्हणजे पर्यटकाने त्याच्या दैनंदिन जिवनातील व्यक्त कार्यक्रमातून मनोरंजन, अभ्यास, आरोग्य व आराम मिळविण्यासाठी केलेला प्रवास होय. दुस-या भाषेत पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील स्थानी अल्पकालीन केलेले स्थलांतर होय. हे स्थलांतर, संशोधन, व्यवसाय, मनोरंजन, ऐषआराम यासाठी केलेले असते.

❖ **पर्यटनाची वैशिष्ट्ये** :

१) पर्यटन हा आर्थिक व्यवसाय आहे. यामध्ये पर्यटक ज्या ठिकाणांना भेटी देतो त्याठिकाणी आर्थिक व्यवहार करतो. त्यामुळे रोजगार निर्मिती होते.

२) पर्यटन या व्यवसायात अभौतिक उत्पादन केले जाते. ज्याचा हेतू आनंद व समाधान अथवा ज्ञान मिळवून देणे हा असतो.

३) पर्यटन हा व्यवसाय राजकीय व सामाजिक ऐक्य निर्माण करतो.

४) पर्यटन हा संवेदनशिल व्यवसाय आहे. कारण लोकांच्या आवडी-निवडी, धार्मिक भावना, सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा परिणाम पर्यटनावर होतो.

५) पर्यटनावर ऋतू या घटकाचा परिणाम होतो. उन्हाळा, हिवाळा व पावसाळा या ऋतू मध्ये पर्यटक विशिष्ट ठिकाणांना भेटी देतात.

६) पर्यटन व्यवसायाचा अनेक व्यवसायांशी संबंध येतो. उदाहरणार्थ - वाहतूक, निवास, भोजन, मार्गदर्शक, दुकानदार इत्यादी व्यवसायांशी संबंध येतो.

❖ **पर्यटनाचे महत्व :**

पर्यटन हा उद्योग बहुस्पर्शी असल्याने विविध क्षेत्रात पर्यटनाचे महत्व वाढत आहे. विकसीत व विकसनशील राष्ट्रांच्या प्रगतीमध्ये पर्यटनाचा महत्वाचा वाटा आहे. पर्यटनाचे महत्व हे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात वाढत आहे. पर्यटनाचे महत्व खालील विविध घटकावरून दिसून येते.

**१) रोजगार निर्मिती -**

पर्यटन उद्योगामुळे सर्वच क्षेत्रात थोड्या-अधिक प्रमाणात रोजगार उपलब्ध होतात. पर्यटनामध्ये कुशल व अकुशल कामगारांची गरज असते. पर्यटनातून भोजनव्यवस्था, निवासव्यवस्था, वाहतूक- दळणवळण, रिटेल व होलसेल दुकानदार या ठिकाणी सर्वच स्तरात रोजगाराची निर्मिती असते.

**२) बाजारपेठांची निर्मिती -**

पर्यटक ज्या ठिकाणांना भेटी देतात त्या ठिकाणी वस्तूंची खरेदी करतात त्यातूनच बाजारपेठांची निर्मिती होते. या बाजारपेठेतून पुजा साहित्य, खेळणी, कपडे, प्रादेशिक वस्तू,त्या ठिकाणातील प्रसिद्ध वस्तू उदा. कोल्हापूरी चप्पल, काश्मिरी शाल, म्हैसूर चंदन, आसामचा चहा या सर्व वस्तूंची बाजारपेठ प्रसिद्ध आहे. यातूनच बाजारपेठांचा विकास झाला.

**३) परकीय चलन -**

आंतरराष्ट्रीय पर्यटक दुसऱ्या देशात पर्यटनासाठी जाताना आपल्या देशाचे चलन घेऊन जातात त्यामुळे परकिय चलनाची देवाण-घेवाण होते. पर्यटक देशात आल्यापासून परत त्याच्या देशातजाईपर्यंत विविध ठिकाणी पैसा खर्च करतो. यातूनच आपल्याला परकीय चलन मिळते, उदाहरणार्थ- नेपाळ या देशाला पर्यटनातूनच सर्वात जास्त परकीय चलन मिळते.

**४) देशाच्या आर्थिक विकासाला मदत -**

देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावण्यासाठी पर्यटन महत्वाची जबाबदारी पार पाडत आहे. पर्यटनातून रोजगार उपलब्धता व्यवसायांची निर्मिती, पर्यटक केंद्राची निर्मिती या सर्वचबाबींच्या विकासातून

देशाच्या तिजोरीत कर स्वरुपात भर पडते. काही देशाची अर्थव्यवस्था ही पूर्णपणे पर्यटनावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ- केनिया, स्वित्झर्लंड, नेपाळ इत्यादी.

**५) प्रादेशिक समतोल राखण्यास मदत -**

भारतासारख्या क्षेत्रफळाने मोठ्या असणाऱ्या देशात प्रादेशिक असमतोल असतो. तो असमतोल कमी करण्यासाठी पर्यटन हा महत्वाची भूमिका पार पाडत आहे. जन्मू-काश्मिर, ईशान्येकडील राज्ये मागासलेली आहेत. या राज्यांचा विकास पर्यटनामुळे विकसीत झाला आहे.

**६) संस्कृतीचे जतन होते-**

सांस्कृतीक कुतुहल व सांस्कृतिक विविधता हे पर्यटनामागचे महत्त्वाचे उद्देश आहेत. इतरदेशातील सांस्कृतिक कुतुहलामुळे लोक तेथील संस्कृती पाहण्यासाठी जातात. त्यातूनच त्या पर्यटन स्थळावरील संस्कृतीचे जतन होते. उदा. राजस्थान मध्ये राजस्थानी राजवाडे, संस्कृती यांचे जतन पर्यटनामुळे झाले आहे.

**७) जागतिक सामंजस्य निर्माण होण्यास मदत होते –**

पर्यटनांमुळे पर्यटक देशाच्या सीमा ओलांडून जातात. ज्या देशांत आंतरराष्ट्रीय सामंजस्य आहे त्या देशात सामजंस्य निर्माण होण्यास पर्यटनाची मदत होते.

❖ **पर्यटनाचा आर्थिक घटकावर होणारापरिणाम** :-

पर्यटनाचा प्रामुख्याने प्रभाव दिसून येतो तो आर्थिक घटकावरच कारण अर्थाजनाच्या विविध संधी यामुळे उपलब्ध होत असताना दिसून येतात. सध्या पर्यटन हा एक प्रमुख आर्थिक व्यवसाय आहे. जगातील बहुतांश देशात याव्यवसायाची वाढ व विकास होत आहे. पर्यटन व्यवसायामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उत्पादनाच्या संधी उपलब्ध होत आहेत. तसेच सरकारलाही या मधून महसूलमिळत आहे. स्थानिक लोकांच्या राहणीमानात बदल घडून येत आहेत. एल. जी. रिचर्डस यांच्या मते पर्यटन व अर्थ व्यवस्था यामध्ये दोन प्रकारचे संबंध असतात. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष, प्रत्यक्ष संबंधामध्ये वाहतूक खर्च, दळणवळण, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था इ.तर अप्रत्यक्ष संबंधामध्ये व्यापारी वस्तू ज्या इतर व्यापारी किंवा उद्योगाकडून खरेदी केल्या जातात अशांचा समावेश होतो. उदा. अन्नधान्य भाजीपाला, फळे, पेये, फर्निचर, लाकडी सामान, खेळाचे साहित्य व इतर सुविधा. पर्यटनाचा आर्थिक घटकावर चांगला परिणाम झाल्याचे दिसून येते. त्याचे विवेचन खालीलप्रमाणे सांगता येईल.

**अ) रोजगाराच्या संधी -**

रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा एक उद्योग म्हणून पर्यटन उद्योगाकडे पाहिले जाते. यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. पर्यटनामुळे सेवा उद्योगाला चालना मिळाली आहे.यामध्ये कुशल व अकुशल लोकांनाही रोजगार उपलब्ध झाला आहे. हा सेवाउद्योग असल्याने स्थानिक लोकांना या उद्योगात प्रचंड रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. यामध्ये अकुशल कामगारां ध्ये हमाल, माळी, घरगडी, स्विपर्स (सफाईवाले) घोडेवाले/खेचर,हाऊसकिपर्स,खाद्य व शितपेये विकणारे, करमणूकीचे खेळ करणारे इ. लोकांचा समावेश होतो. तर निम कुशलमध्ये रोखपाल, हिशेबनीस, आचारी, वेटर्स, गाईडस,वाहन चालक, टॅक्सी चालक, फोटोग्राफर्स इ.चा समावेश होतो. तर कुशल कामगारामध्ये सहल व्यवस्थापक, प्रवासी एजंट इ. चा समावेश होतो.

पर्यटन व्यवसायामुळे हॉटेल, रेस्टॉरंटस्-खानावळ, हातगाडीवाले, प्रवासी एजंट, वाहतूकदार, दुकानदार इ. व्यवसाय सुरू झाले आहेत. उदा. महाबळेश्वर, सिमला,कुलू मनाली - सारख्या पर्यटनठिकाणी. पंचतारांकीत हॉटेल, रेस्टॉरंट, प्रवासी एजंट, वाहतूकदार, दुकानदार यांना रोजगाराच्या प्रचंडसंधी उपलब्ध झाल्या आहेत.

**ब) परकीय चलन -**

परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध देश प्रयत्न करीत आहेत. पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी निरनिराळ्या देशातून अनेक पर्यटक येत असतात. ते आपआपल्या देशातील चलन बरोबरघेऊन येतात. असे परकीय चलन देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. अशा चलनाचा त्यादेशाच्या/प्रदेशाच्या विकासाला फायदा होत

असतो. विकसनशील देशांना ज्या वेळी विदेशी पर्यटक भेटी देतात त्यावेळी त्या देशाची अर्थव्यवस्था वाढविण्यास मदत होते. औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशातून जेव्हा पर्यटक येतात तेव्हा अशा अविकसीत किंवा विकसनशील देशाचा विकासाचा वेग वाढतो. या चलनाद्वारे आंतरराष्ट्रीयबाजारातून विदेशी माल आयात करण्यास मदत होते.परकीय चलन बदलून देणारा उद्योगही बऱ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. परकीय चलनावर पर्यटन व्यवसायाचा कसा विकास झाला हे कळून येते.

**क)राष्ट्रीय उत्पादनवाढ -**

पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध देश पर्यटन विषयक धोरण अवलंबित असताना दिसून येते. कारण यातून मिळणारे उत्पन्न हे राष्ट्राच्या एकूणच उत्पादनात वाढ करणारे असते. अनेक सुप्त पर्यटन ठिकाणे शोधून काढून त्यांचा विकास करण्यावर विविध देशांचा भर आहे. त्या पर्यटन ठिकाणांची जाहिरात करून पर्यटकांना आकर्षित केले जाते. विविध सेवा व सुविधा पुरवल्या जाऊन एकूण उत्पादनात वाढ केली जाते.पर्यटकांकडून विविध सेवा, सुविधा व वस्तूंची मागणी होत असते.त्यामुळे त्या प्रदेशातील मालाचे उत्पादन व विक्रीत वाढ होते व त्याचा फायदा आर्थिक उत्पादनाला मिळतो. हॉटेल्स, आरोग्य धामे, विश्रामगृहे, विमानतळ, वाहतुकीचे मार्ग, वाहतुकीची साधनेइत्यादीतून मिळणारे उत्पादन त्या देशाच्या आर्थिक विकासात भर घालते. तसेच यातून हॉटेलचालक, कामगार यांचा फायदा व पगारही निघत असतो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पादन वाढीस पर्यटन व्यवसाय हातभार लावत असताना दिसून येते.

**ड) लघू व मध्यम उद्योगांना चालना -**

पर्यटनामुळे अनेक लघू व मध्यम उद्योगांना चालना मिळते. खाद्य पदार्थ, खेळणी, भेटवस्तू, शोभेच्या वस्तू, पर्यटन सेवा देणारी केंद्रे, टॅक्सी, प्रवासी (पर्यटक) वाहतूक, घोडा गाडी, परकीय चलन बदलून देणारी केंद्रे इ. लघूउद्योगांना चालना मिळते. तर विविध पर्यटन/सहल व्यवस्था निर्माणकरणाऱ्या कंपन्याही उदयास येत असताना दिसून येतात. उदा. केसरी टूर्स, विणा वर्ल्ड, इ. सारख्या मध्यम उद्योग विकास पावत आहेतयामुळे अनेक रोजगाराच्या संधीही उपलब्ध होत आहेत. काही क्रूझ सेवाही अलिकडे विकसीत होत असताना दिसत आहेत.

**इ) स्थानिक बाजारपेठांचा विकास -**

पर्यटनामुळे स्थानिक बाजारपेठांचा विकास झाला आहे. पर्यटक भेटी देत असलेल्या ठिकाणी त्यांना विविध सेवा देण्याकरीता बाजारपेठा विकसीत झाल्या आहेत. त्या बाजारपेठा आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या असतात. पर्यटन केंद्राला भेटी देण्यासाठी येणारे पर्यटक आपल्या भ्रमंतीच्या काळातविविध वस्तू खरेदी करतात. त्यामुळे तेथील व्यवसाय वाढीस मदत होते. विविध हस्तोद्योग, कुटीरउद्योग, इत्यादीतून निर्माण केलेल्या वस्तू या बाजारपेठेत असतात. वशिष्ट खाद्यपदार्थ, कलाकुसर केलेल्या वस्तू, भरतकाम व विणकाम केलेले कापड, भांडी, स्वेटर्स, शाली, रजई, लाकडी वस्तू, खेळणी इ. वस्तू विकणाऱ्यांचा यामध्ये समावेश असतो.पर्यटकांना या गोष्टी आकर्षित करतात व त्यातूनच बाजारपेठांचा विकास होतो. उदा. महाबळेश्वर येथील बाजारपेठ, सिमला येथील लोअर बझार, अप्पर बझार, लक्कड बझार, मालरोड इ.

**ई) महसूल निर्मिती**–

पर्यटकांनी खरेदी केलेल्या मालावर सरकारचा कर असतो तसेच विविध सेवा सुविधा जसे की, हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळी, दुकाने, टॅक्सी, चित्रपटगृहे, नाट्यगृहे इ. च्या उत्पादनातून सरकारला कर मिळत असतो. त्यामुळे सरकारच्या महसुलात भर पडते.

**प) राष्ट्रीय साधन संपत्तीचा उपयोग -**

प्रत्येक देशात विविध प्रकारची साधन संपत्ती असते जी पर्यटकांना आकर्षित करते. उदा. पर्वत, डोंगर रांगा, नद्या, धबधबे, जंगले, धरणे, किल्ले, वन पशूपक्षी, अभयारण्ये, स्मारके, समुद्र किनारे, बेटे, संरक्षीत ठिकाणे हेपाहण्यासाठी पर्यटक येतात. त्यातून या साधन संपत्तीचा उपयोग पर्यटनव्यवसायासाठी केलेला दिसून येतो. जर पर्यटक अशा ठिकाणाला भेटी देण्यास आले नसते तर ती ठिकाणे तशीच राहिली असती. अलिकडे मंदीरे सुद्धा

पर्यटनाच्या दृष्टीने विकास पावत आहेत.उदा. महाराष्ट्रातील शेगाव या ठिकाणी आनंद सागर सारखी ठिकाणे विकसीत केली आहेत. तसेच तामिळनाडूतील वेल्लूर येथील सुवर्णमंदिरही पर्यटकांसाठी विकसीत केले आहे. तसेच विविध ठिकाणी पॅगोडाही विकास पावत आहेत.

**फ) पर्यटन व गुंतवणूक -**

सध्या पर्यटनामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत असताना दिसून येते. यामध्ये हॉटेल, रेस्टॉरंट यामध्ये होत असलेली गुंतवणूक लक्षणीय आहे. सरकारी व खाजगी क्षेत्रातील ही गुंतवणूक यामध्ये वाढत आहे. दुबईसारखे शहर आजकालपर्यटनाच्या दृष्टीने विकसीत होत आहे. कारण खनिज तेलाचे साठे चिरकाल टिकणार नाहीत याची जाणिव झाल्याने येथे विविध पर्यटकांना आकर्षितकरण्यासाठी मोठ मोठी हॉटेल्स, पामद्दी आयलॅन्ड, वर्ल्ड आयलॅन्ड विकसित केले आहेत. अशाप्रकारे पर्यटनात गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे.

अशाप्रकारे विविध आर्थिक घटक पर्यटन व्यवसायाला चालना देणारे ठरत आहेत व यातून त्याप्रदेशाचा विकास, स्थानिकांना रोजगार, राष्ट्रीय संपत्तीत वाढ, राष्ट्रीय साधन संपत्तीचा उपयोग इ. घटना घडत असताना दिसून येते.

❖ **पर्यटनआणि शाश्वत विकास -**

पर्यटन हा मानवाला आनंद देणारा असतो म्हणून त्याचा विकास करत असताना पर्यावरणाचे संतुलन राखले पाहिजे. पर्यटनाचा शाश्वत विकास करीत असताना नैसर्गिक पर्यटनाची ठिकाणे तेथील जैव विविधता व मानव यांचा सहसंबंध अभ्यासणे आवश्यक आहे. पर्यटनाचा विकास करताना तो भविष्यात कशा प्रकारचे स्वरूप प्राप्त करू शकतो याची दूरदृष्टी असावी.यामध्ये आर्थिक विकास व पर्यटन, पर्यावरण व पर्यटन, सामाजिक व सांस्कृतिक घटक व पर्यावरण आणि मानव व पर्यटन यांच्या सह संबंधाचा अभ्यास सखोल पद्धतीने होणे आवश्यक आहे.पर्यटनाचा शाश्वत विकास करताना त्याचे नियोजन लघू स्तरांपासून ते उच्च स्तरांपर्यत विचार करून करावे लागते. एखाद्या प्रदेशातील पर्यटनाची संधी व मानवाने केलेला विकासयांचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

❖ **पर्यटनाच्या समस्या -**

१) पर्यटनातून पर्यावरणाचा ऱ्हास होतो. प्रदूषण ही एक पर्यटनामुळे मोठी समस्या बनली आहे.
२) वन्य प्राणी व पक्षांच्या अधिवासास पर्यटकांकडून हानी पोहचत आहे.
३) पर्यटनामुळे सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. त्यामध्येआमली पदार्थाची तस्करी, गुन्हेगारी, बालकांचे शोषण या सारख्या समस्या निर्माण होतात.
४) पर्यटनामुळे आर्थिक टंचाई, करात वाढ, किमतीमध्ये वाढ, वस्तूंची टंचाई यासारख्या समस्या निर्माण होतात.
५) पर्यटनामुळे सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचा ऱ्हास होत आहे. किल्ले, राजवाडे, स्मारके,मंदिरेयांचे पर्यटकांकडून नुकसान होते.
६) पर्यटनातून सामाजिक जिवनपद्धती बदलत आहे. त्यामुळे पारंपारिक मुल्यांचा ऱ्हास होत आहे.

पर्यटनाच्या अनेक समस्या असल्या तरी पर्यटनातून देशाला मोठा आर्थिक स्त्रोत लाभत आहेत. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होते.

**सारांश –**

भारत हा जगातील प्राचीन संस्कृतिचा, विविधता असणारा, सर्व संपन्न असा देश आहे. योग्य प्रकारे पर्यटनाचे नियोजन केल्यास भारतात फार मोठ्या प्रमाणावर पर्यटनाचा विकास होऊ शकेल. आधुनिक जगात पर्यटन व्यवसायाचे महत्व दिवसेंदिवस दिवस वाढत आहे. भारत हा विकसनशिल देश आहे. आपल्या देशातील विविधतेचा उपयोग पर्यटन व्यवसायासाठी करून मोठ्या प्रमाणावर परकिय चलन मिळविण्याची संधी आहे. यासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न करून पर्यटन व्यवसायाच्या विकासाची गरज आहे.

भारतात प्राचीन काळापासून जरी पर्यटन होत असले तरी पर्यटनाचा खऱ्या अर्थाने विकास भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच सुरू झाला. त्यामध्ये सार्जंट समितीचे कार्य, मध्यवर्ती पर्यटन संघटना, पर्यटन वाहतूक समिती, पर्यटन माहिती कार्यालये,पर्यटन मंत्रालयाची स्थापना, भारतीय पर्यटन विकास महामंडळ, पर्यटन विषयक विविध धोरणांची अंमलबजावणी इ. प्रकारच्या विविध टप्या टप्याने केलेल्याप्रयत्नामुळे भारतात पर्यटनाचा विकास होत गेलेला आढळतो. आज त्याचा परिणाम म्हणून पर्यटन व्यवसाय देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये आपले स्थान बळकट करू लागल्याचेदिसते.

**संदर्भ:**

१) डॉ. घारपुरे विठ्ठल – पर्यटन भूगोल , पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर (२००९)

२) खतीब के. ए.- पर्यटन भूगोल मेहता प्रकाशन(२००६)

३) भागवत अ. वि.- पर्यटन भूगोल(१९९८)

४) डॉ. एस. बी. शिंदे - पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर